| CNR No.MHWR040003342024 | दाखल दिनांक | : | २६/०२/२०२४ |
|---|---|---|---|
| | नोंदणी दिनांक | : | २६/०२/२०२४ |
| | निकाल दिनांक | : | २४/०७/२०२६ |
| | कालावधी | | वर्ष. म. दि.<br>०२ ०४ २८ |

निशाणी क्र.०६ पुढे

## नमुना क्र.३२

## पार्ट–अ

## (न्यायनिर्णयाची शिर्षक पृष्ठ)

## फौजदारी नियमावली प्रकरण क्र.६ चा परिच्छेद ४४ (i)

| |
|---|
| **सेलु येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**<br>**ता. सेलु, जि. वर्धा**<br>**(पिठासीन अधिकारी – एस.आर.सातभाई)**<br>न्यायनिर्णय घोषीत दिनांक २४/०७/२०२६<br>**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.२६०/२०२४)** |
| अपराध क्र. ११९/२०२४, पोलीस स्टेशन सेलू, ता. सेलू, जि.वर्धा |

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस निरिक्षक, पो.स्टे.सेलू. |
| **अभियोगपक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता –<br>श्रीमती व्ही.एम.गजभिये |
| **आरोपी** | १. | **समीर शकील शेख,**<br>वय – २८ वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br>राहणार – जोशी नगर, ता. सेलू व जि. वर्धा. |
| **आरोपी तर्फे विधीज्ञ** | | श्री. व्ही.बी.गोमासे |

## भाग – ब

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :- | ०९/०२/२०२४ |
| फिर्याद दाखल दिनांक | :- | ०९/०२/२०२४ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :- | २६/०२/२०२४ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | ०९/०९/२०२५ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | ०९/०९/२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | २४/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशांचा दिनांक | :- | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (**Set Off**) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | समीर शकील शेख | ---- | ---- | भा.दं.वि. कलम २७९, मो.वा.का. कलम १८५ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग –क

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))**

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार.**

अ. अभियोग पक्ष

| सा. | साक्षीदारांचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | शरद भिवाजी चव्हाण | पंच साक्षीदार | ०६ पुढे |

ब. बचाव पक्षाचे साक्षीदार –

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

क. न्यायालयीन साक्षीदार –

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

अ. अभियोग पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | नाही | |

ब. **बचाव पक्ष**

| **क्रमांक** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| **नाही** | | |

क. **न्यायालयामार्फत निशाणी फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा.**

| **अ.क्र.** | **निशाणी क्रमांक** | **वर्णन** |
|---|---|---|
| **१.** | निशाणी क्र.०७ | साक्षीदार क्र.०१ ची घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीला |

**ड. भौतीक वस्तु** -

| अनु क्रमांक | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| -- | ---- | ---- |

# न्यायनिर्णय
## (घोषीत दिनांक : २४/०७/२०२६)

अभियोगपक्षाने सदर खटला आरोपीविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २७९ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८५ अंतर्गत दाखल केला आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे** –

२. दि.०९/०२/२०२४ रोजी फिर्यादी हे जोशी नगर मध्ये पेट्रोलींग करीत असतांना त्यांना आरोपी वाहन चालक त्याच्या ताब्यातील दुचाकी वाहन सार्वजनिक रोडवर भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने वाहन चालवितांना मिळुन आला. सदर वाहन क्रमांक एम.एच.३२–एस–३१२४ रोडवर भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने चालवितांना मिळुन आल्याने त्यांनी आरोपीला थांबवुन त्याची ब्रिथ ॲनालाईझर मशिनद्वारे दारु पिण्यबाबतची तपासणी केली असता आरोपी हा दारु सेवन केल्याबाबत अल्कोहोलीक कंटेंट प्राप्त झाला. आरोपी हा दारु पिउन नशेत भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने लोकांचे जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत

वाहन चालवितांना मिळुन आल्याने फिर्यादीने आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन सेलू येथे फिर्याद दिली. सदरची फिर्याद पोलीस स्टेशन सेलू येथे अपराध क्र.११९/२०२४ भारतीय दंड विधानाचे कलम २७९ व मोटरवाहन कायद्याचे कलम १८५ अन्वये आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल केले.

३. तपासकामी तपासी अधिकारी श्री. देवराव येणकर यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला. वैद्यकीय तपासणी अहवाल प्राप्त केले. आरोपीविरुद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने, त्याचे विरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपीविरुद्ध भारतीय दंड विधान कलम २७९ मोटर वाहन कायदान्वये कलम १८५ अन्वये आरोप ठेवुन निशाणी क्र.०६ पुढे आरोपीचा तपशील नोंदविला. त्यातील मजकूर आरोपीला वाचून दाखविला व त्याला मराठी भाषेमध्ये समजावून सांगण्यात आला. आरोपीने तो अमान्य करुन प्रकरण चालविण्यासाठी विनंती केली. आरोपीविरुद्ध अभियोगपक्षाने नोंदविलेल्या साक्षीपुराव्यातुन गुन्हयाशी संबंधीत पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१) (ब) नुसार बयान नोंदविण्यात आले नाही. प्रस्तुत प्रकरणात विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये तसेच आरोपीतर्फे विद्वान वकील व्ही.बी.गोमासे यांच्या युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. अभियोगपक्षाचे म्हणणे विचारात घेता, खालील बाबी विचारार्थ येत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक ०९/०२/२०२४ रोजी १७.०० ते १७.३० वाजताच्या दरम्यान जोशी नगर, सेलू, ता.सेलू व जि.वर्धा येथे सार्वजनिक रस्त्यावर आरोपीने त्याच्या ताब्यातील वाहन मोटरसायकल क्र.एम.एच.३२–एस–३१२४ ही मनुष्य जिवीतास किंवा सुरक्षीततेस धोका पोहचेल अशी हयगयीने व निष्काळजीपणे चालविली, त्याप्रमाणे आरोपीने भारतीय दंड विधानचे कलम २७९ अंतर्गत गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| २. | अभियोगपक्षाने असे सिध्द केले काय की, वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी, आरोपीने त्याचे त्याब्यातील वाहन मोटरसायकल क्र.एम.एच.३२–एस–३१२४ ही दारुच्या अंमलाखाली असतांना, इतरांचे जिवीत्वास धोका निर्माण होईल अशा बेदरकारपणे व निष्काळजीपणे चालविले, त्याप्रमाणे आरोपीने मोटर वाहन कायदयाचे कलम १८५ नुसार गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ३. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे आरोपीला निर्दोष मुक्त.** |

## ...कारणमिमांसा...

६. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्द वर नमुद गुन्हे सिध्द करण्यासाठी फक्त एकच साक्षीदार तपासले आहे. अभियोगपक्षाने आरोपी वरील दोषारोपीत गुन्हे सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्ष साक्षीदार क्रमांक १ नामे शरद भिवाजी चव्हाण (पंच) यांना निशाणी क्र.०६ पुढे तपासले आहे.

७. अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर त्याच्या ताब्यातील वाहन मनुष्य जिवीतास किंवा सुरक्षीततेस धोका पोहचेल अशी हयगयीने व निष्काळजीपणे चालविले, तसेच आरोपीने त्याचे त्याब्यातील वाहन दारुच्या अंमलाखाली

असतांना, इतरांचे जिवीत्वास धोका निर्माण होईल अशा बेदरकारपणे व निष्काळजीपणे चालविले, ही बाब सिद्ध करणे आवश्यक आहे.

**मुद्दे क्र.१ व २ करीता :**

८. वरील सर्व मुद्दे एकाच प्रकारच्या पुराव्यावर अवलंबुन आहेत. त्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरचे मुद्दे एकत्रात विचारार्थ घेत आहे.

९. अभियोग पक्षाने आरोपीवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी प्रथमतः शरद भिवाजी चव्हाण (पंच) यांना निशाणी क्र.०६ पुढे नोंदविण्यात आली. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, पोलीसांनी त्यांना दि.०९/०२/२०२४ रोजी पंचनामा करण्यासाठी कुठेही बोलविले नव्हते. पोलीसांनी त्यांच्या समक्ष कोणतीही कार्यवाही केली नाही. पोलीसांनी त्यांची एका लिहिलेल्या कागदांवर सही घेतली होती. त्यांना सदरचा पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर त्यांची सही असुन मजकूराबाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे कथन केले. सदरचा प्रकरणातील साक्षीदार हा अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे न्यायालयाचा परवानगीने सरकारी वकिलांनी त्यांचा उलटतपास घेतला. त्यामध्ये साक्षीदाराने स्पष्टपणे नाकारले आहे की, पोलीसांनी त्यांना दि.०९/०२/२०२४ रोजी पंचनामा करण्यासाठी जोशी नगर, सेलू येथे बोलविले होते. पोलीसांनी तेथे त्यांना पोलीस स्टेशन सेलू टाउन परिसरात ट्रॉफिक पेट्रोलिंग करीत असतांना एक इसम वाहन स्कुटी गाडी क्रमांक एम.एच.३२–एस–३१२४ ही रोडवर भरधाव वेगाने मानवी जिवीतास होनी होउन धोका निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन चालवितांना मिळुन आला म्हणून बोलविले होते.

पोलीसांनी त्यांच्या समक्ष मशीनद्वारे दारु पिण्याबाबत तपासणी केली. पोलीसांनी आरोपीला त्याचे नाव गाव विचारले असता आरोपीने त्याचे नाव समीर शेख असे सांगितले. पोलीसांनी पंचनामा घटनास्थळावर तयार केला व त्यावर त्यांनी वाचुन व समजून सही केली. अभियोग पक्षास साक्षीदाराच्या उलटतपासात आरोपीविरुध्द उपयुक्त असा कोणताही मजकूर अभिलेखावर आणता आला नाही. त्यामुळे साक्षीदाराची साक्ष आरोपीवरील गुन्हा शाबित करण्यास पुरेशी नाही.

१०. उपलब्ध साक्षपुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द होण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभिलेखावर आलेला नाही. आरोपीने सार्वजनिक रस्त्यावर त्याच्या ताब्यातील वाहन मनुष्य जिवीतास किंवा सुरक्षीततेस धोका पोहचेल अशी हयगयीने व निष्काळजीपणे चालविले, तसेच आरोपीने त्याचे त्याब्यातील वाहन दारुच्या अंमलाखाली असतांना, इतरांचे जिवीत्वास धोका निर्माण होईल अशा बेदरकारपणे व निष्काळजीपणे चालविले असे साक्षीदाराने सांगितले नाही. अभियोगपक्षाने फिर्यादी व इतर साक्षीदारांना तपासलेले नाही. तसेच अभिलेखाची पाहणी केली असता, आरोपी हा दारुच्या नशेत भरधाव वेगाने व निष्काजीपणाने वाहन चालवित होता, याबाबत कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे कोणतीही घटना घडली होती यावर विश्वास बसत नाही. त्यामुळे अभियोगपक्ष आरोपीवरील आरोप सिध्द करण्यास सपशेल अपयशी ठरला आहे. तसेच आरोपीविरूध्द कोणताही सबळ पुरावा

अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपीने भा.दं.वि.चे कलम २७९ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८५ नुसार गुन्हा केल्याची बाब सिध्द झालेली नाही. वरील विवेचनावरुन मी मुद्दे क्र.१ व २ चे नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.३ बाबत :**

**११.** उपरोक्त पुराव्याचे विश्लेषण करता व एकंदर कायदेविषयी परिस्थितीचा बारकाईने विचार करता, अभियोग पक्ष आरोपीविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. सबब, उपरोक्त गुन्हयातून साक्षपुराव्या अभावी संशयाचा फायदा देउन आरोपीची निर्दोष मुक्तता करणे मला न्यायोचित वाटते. परिणामत: मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी **समीर शकील शेख** यास भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) [फौजदारी प्रक्रीया संहिताचे कलम २४८(१)] अन्वये गुन्हा क्र. ११९/२०२४ भारतीय दंड विधान कलम २७९ व मोटर वाहन कायद्याचे कलम १८५ अन्वये पोलीस स्टेशन सेलू, या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपीचे वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपीने रक्कम रु. १५,०००/– चा वैयक्तीक मुचलका भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ] प्रमाणे दाखल करुन पुर्तता करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.07.24 17:14:17 +0530

(एस.आर.सातभाई)

**दिनांक** : २४/०७/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सेलू

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)